# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.07.2024** **वार:शनिवार**

---

**ठळक बातम्या**

- दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्यांचे मनसुबे कधीही यशस्वी होऊ देणार नाही – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इशारा
- कारगिल विजय दिनाचा रौप्य महोत्सव राज्यासह संपूर्ण देशभरात अभिमानाने साजरा
- कल्याणी नगर पोर्श कार अपघात प्रकरणी पुणे पोलिसांकडून आरोपपत्र दाखल
- पॅरिस ऑलिंपिकचं दिमाखात ऐतिहासिक उद्घाटन; आणि
- महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारत-श्रीलंका अजिंक्यपदाचा सामना

**पंतप्रधान**

दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्यांचे मनसुबे, आपलं लष्कर कधीही यशस्वी होऊ देणार नाही, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी काल दिला. आपले शूर वीर जवान दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 25 व्या कारगिल विजय दिनानिमित्त, पंतप्रधानांनी काल कारगिल युद्ध स्मारकाला भेट देऊन या युद्धात सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना आदरांजली अर्पण केली, त्यावेळी ते बोलत होते. देशासाठी दिलेलं सर्वोच्च बलिदान अमर असतं, हे कारगिल विजय दिनी अधोरेखित होतं, असं मोदी म्हणाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही कारगिल युद्धातील वीरांना आदरांजली अर्पण केली.

**संसद**

संसदेच्या दोन्ही सभागृहातही काल कारगिल युद्धातील शहीदांना आदरांजली अर्पण करण्यात आली. दोन्ही सभागृहांमध्ये अर्थसंकल्पावरील चर्चा कालही सुरू होती.

**कारगिल विजय दिवस**

कारगिल विजय दिनाचा रौप्य महोत्सव काल राज्यातही सर्वत्र मोठ्या अभिमानाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. राज्यपाल रमेश बैस यांनी काल कुलाबा इथल्या शहीद स्मारकावर पुष्पचक्र

अर्पण करून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही कारगिल युद्धातील हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. या युद्धात प्राणांची बाजी लावणाऱ्या महाराष्ट्रातल्या वीर जवानांचं त्यांनी स्मरण केलं. कारगिल विजय दिनानिमित्त काल महाराष्ट्रातर्फे मेघालय, मिझोरम आणि त्रिपुरा या राज्यांना ३ रुग्णवाहिका देण्यात आल्या. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राजभवनातून या रुग्णवाहिका काल रवाना करण्यात आल्या. पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातल्या युद्ध स्मारकावर आयोजित समारंभात दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी पुष्पचक्र अर्पण करून हुतात्मा जवानांच्या अतुलनीय शौर्य आणि बलिदानाला आदरांजली वाहिली. केंद्रीय संचार ब्युरोच्या पुणे प्रादेशिक कार्यालयाच्या वतीनं पिरंगुट इथल्या राणी लक्ष्मीबाई मुलींच्या सैनिकी शाळेत कारगिल विजय दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा उद्यापासून नियोजित असलेला महाराष्ट्राचा दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. 29 जुलै रोजी राज्य विधान भवनातील नियोजित कार्यक्रमही काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात आला असल्याचं विधिमंडळ सचिवालयानं कळवलं आहे.

**पुणे पाऊस - मुख्यमंत्री**

पुणे शहर आणि परिसरात गुरुवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्या घरांमध्ये पाणी शिरलं होतं, त्या घरांमध्ये युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. पुरामुळे घरं आणि शेतीच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत. पुराचं पाणी आणि चिखलामुळे परिसरात रोगराई पसरू नये, यासाठी महापालिका प्रशासनानं औषधांची फवारणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

**मोहोळ आढावा**

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही काल पुणे जिल्ह्यातील पूर परिस्थितीबाबत आढावा बैठक घेतली. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून बाधित नागरिकांना तात्काळ मदत करावी, आपत्तीच्या काळात सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कामं करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

**पोर्श अपघात**

पुण्याच्या कल्याणी नगर इथल्या पोर्श कार अपघात प्रकरणी पुणे पोलिसांनी काल विशेष न्यायाधीश न्यायमूर्ती यू एम मुधोळकर यांच्या न्यायालयात 900 पानांचं आरोपपत्र दाखल केलं. अल्पवयीन

मुलाचे आई-वडिल, विशाल आणि शिवानी अग्रवाल, यांच्यासह 2 डॉक्टर्स, ससून रुग्णालयाचा कर्मचारी आणि 2 मध्यस्थ यांच्याविरुद्ध हे दोषारोपपत्र दाखल केलं आहे. या आरोपपत्रात अल्पवयीन आरोपीचं नाव नाही. 19  मे रोजी कल्याणी नगर भागात झालेल्या या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता.

**नीट**

राष्ट्रीय परीक्षा संस्था एनटीएनं काल नीट-यूजी परीक्षेचा सुधारित अंतिम निकाल जाहीर केला. विद्यार्थ्यांना एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर आपला निकाल पाहता येईल. या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणारे 17 विद्यार्थी आहेत, असं एनटीएनं म्हटलं आहे.

**ऑलिंपिक उद्घाटन**

पॅरीस ऑलिंपिक्स 2024 चं उद्घाटन काल पॅरीस इथं अतिशय दिमाखात करण्यात आलं. या स्पर्धांच्या इतिहासात प्रथमच मैदानाबाहेर सुरु झालेला हा सोहोळा नंतर चार तास सुरु होता, त्यामध्ये सात हजार खेळाडू सहभागी झाले. तीनवेळचा ज्युदो अजिंक्यवीर टेडी रायनर यानं ज्योत प्रज्वलित केली. मुसळधार पावसातही प्रेक्षकांनी आजीवनातील हा दुर्मिळ सोहोळा डोळ्यात साठवला. यावेळी प्रथमच महिला आणि पुरुष दोन्ही खेळाडूंची संख्या समान आहे. प्रत्येक पदकामध्ये आयफेल टॉवरच्या मूळ लोखंडातील तुकडा सामावला आहे.

**ऑलिम्पिक प्रशिक्षक बाईट**

पॅरिस ऑलिंपिकमध्ये बॅडमिंटन या क्रीडा प्रकारात मुंबईचा चिराग शेट्टी पुरुष दुहेरी गटात सहभागी झाला आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये चिरागला पदकाने हुलकावणी दिली असली; तरी यंदा मात्र सर्वांच्याच नजरा त्याच्यावर खिळल्या आहेत. त्याचे प्रशिक्षक उदय पवार यांनी याविषयी आकाशवाणीशी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या....

**महिला क्रिकेट**

महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारतानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य फेरीत भारतानं बांगला देशाचा 10 खेळाडू राखून पराभव केला. बांग्लादेशला प्रथम फलंदाजी करताना निर्धारित 20 षटकात 8 बाद 80 धावाच करता आल्या. भारतीय संघानं हे लक्ष्य 11 षटकातच पूर्ण केलं. दुसऱ्या सामन्यात यजमान श्रीलंकेनं पाकिस्तानवर 3 गडी राखून मात करत अंतिम फेरी गाठली. पाकिस्ताननं प्रथम फलंदाजी करताना 140 धावा केल्या. आता अंतिम फेरीत भारताची लढत आज श्रीलंकेसोबत होणार आहे.

**कॉंग्रेस चर्चा**

महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांशी जागावाटपाची चर्चा करण्याकरता काँग्रेसनं 10 जणांची समिती स्थापन केली आहे. महाराष्ट्रातल्या जागावाटपाची चर्चा नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, नितीन राऊत, आरिफ खान, सतेज पाटील करणार आहेत. वर्षा गायकवाड, भाई जगताप आणि अस्लम शेख मुंबईतल्या जागा वाटपाच्या चर्चेत सहभागी होतील.

**आनंदाचा शिधा**

यंदाच्या गौरी गणपती उत्सवानिमित्त राज्यातील 1 कोटी 70 लाख 82 हजार 86 शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा वितरीत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. 100 रुपयांमध्ये मिळणाऱ्या या "आनंदाचा शिधा" संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल या जिन्नसांचा समावेश असेल. हा शिधा संच 15 ऑगस्ट ते 15 सप्टेंबर या कालावधीत वितरित करण्यात येणार आहे.

**एसटी पास वितरण**

राज्य परिवहन महामंडळानं विद्यार्थ्यांना एसटीचे पास थेट त्यांच्या शाळा-महाविद्यालयात वितरित करण्याची योजना सुरू केली आहे. 18 जूनपासून ही योजना सुरू झाली असून पहिल्या 12 दिवसात एसटीच्या कर्मचाऱ्यांनी 4,03,294 विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन प्रवासी पास वितरित केले. विद्यार्थ्यांनी या योजनेला चांगला प्रतिसाद दिला असून महामंडळाचं उत्पन्न 26 कोटीं रुपयांनी वाढलं आहे, अशी माहिती उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांनी दिली.

**पुणे रेल्वे स्टेशन**

पुणे रेल्वे स्थानक आज 100 व्या वर्षात पदार्पण करत आहे. या स्थानकाची पहिली रचना 1915 मध्ये तयार झाली. या वास्तुचे काम पी. विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली 1922 मध्ये सुरू झालं. 1925 मध्ये काम पूर्ण होऊन 27 जुलै 1925 रोजी तत्कालिन गव्हर्नर यांनी स्थानकाचं उद्घाटन केलं..

**राज्य पूर परिस्थिती**

सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाल्यानं अनेक नागरीकांचं स्थलांतर करण्यात आलं आहे. काही प्रमुख मार्ग बंद असून बऱ्याच गावांशी संपर्क तुटला आहे. धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील कान नदीवरील मालंनगाव मध्यम प्रकल्पातून नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात गोसेखुर्द धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग प्रचंड प्रमाणात कमी केल्यानं पूर ओसरला असून, काही मार्गांवरची वाहतूक सुरू झाली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात जोरदार पाऊस झाला; त्यामुळे भंडारदरा धरण 80 टक्के भरलं आहे. पुणे आणि रत्नागिरीत काल पावसाने काहीशी विश्रांती घेतली. रत्नागिरीत नद्यांची पाणीपातळी हळूहळू ओसरत आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश, कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.